करोना 2020/सुचना/आदेश क्र. ९६७


सत्यमेव जयते

महाराष्ट्रशासन

महसूलववनविभाग

जिल्हाधिकारीवजिल्हादंडाधिकारीकार्यालय,रायगड-अलिबाग

हिराकोटतळयाजवळ,अलिबाग,ता.अलिबाग,जि.रायगड402201

❖दुरध्वनीक्र:02141-222118/222097/222322❖फॅक्सक्र:02141-227451❖

❖ई-मेल:tahasildarmahasul@gmail.com❖


क्रमांक :साशा/कार्या/ब-5/करोनाविषाणु/प्रतिबंधात्मक उपाययोजना/2020 दिनांक : 02/04/2020

**प्रति,**

1. आयुक्त पनवेल महानगरपालिका पनवेल
2. मुख्य कार्यकारी अधिकारी, रायगड जिल्हा परिषद, अलिबाग
3. जिल्हा शल्यचिकित्सक, रायगड अलिबाग
4. पोलीस आयुक्त, नवी मुंबई
5. जिल्हा पोलीस अधिक्षक, रायगड
6. जिल्हा आरोग्य अधिकारी, रा.जि.प, रायगड अलिबाग
7. उपविभागीय अधिकारी (सर्व)
8. तहसिलदार(सर्व)
9. मुख्याधिकारी, नगरपरिषद/ नगरपंचायत (सर्व)
10. गटविकास अधिकारी (सर्व)
11. तालुका आरोग्य अधिकारी (सर्व)

**विषय :-महाराष्ट्राच्या सिमेवर किंवा महाराष्ट्रातील जिल्हयांच्या सिमेवर येणाऱ्या प्रवाशांबाबत करावयाची कार्यवाही**

**संदर्भ** :- मा. प्रधान सचिव सार्वजनिक आरोग्य विभाग मंत्रालय मुंबई यांचेकडील पत्र क्र. करोना 2020/प्र.क्र. 58/आरोग्य 5, दिनांक 28/03/2020

उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये मा. प्रधान सचिव सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय मुंबई यांनी खालील प्रमाणे सुचना दिलेल्या आहेत.

महाराष्ट्र राज्यामध्ये कोविड-19 या आजाराचा झपाटयाने प्रसार होत आहे. या आजाराचे रुग्ण सर्वच विभागांमध्ये आढळून आले आहेत. कोविड-19 नियंत्राणाचा एक भाग म्हणून राज्यामध्ये संपुर्ण Lock Down करण्यात आले आहे. तथापी, महाराष्ट्रातील तसेच काही कारणांमुळे परराज्यात गेलेले प्रवासी, स्थलांतरीत कामगार,बेघर,इ.राज्यामध्ये परत येत आहेत. त्यातील बरेचसे पायी व मिळेल त्या रस्त्याने येत आहेत. या प्रवाशांकडून कोविड-19 चा प्रसार होऊ शकतो, ही बाब लक्षात घेता खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.

1) वर नमूद केल्यानुसार राज्यांतील जिल्हयाच्या सीमेवर किंवा राज्याच्या सीमा भागातील जिल्यांमध्ये जे प्रवासी, स्थलांतरित कामगार, इ. येतील त्यांना वर नमुद केल्यानुसार आहे त्या ठिकाणी प्रत्येक जिल्हयांमध्ये अलगीकरण (Quarantine) मध्ये ठेवण्यात यावे. त्या ठिकाणी त्यांना आवश्यक मुलभूत सुविधा उपलब्ध करुन देण्यात याव्यात.

2) परराज्यातून आलेले प्रवासी, स्थलांतरित कामगार बेघर यांना महसुल विभागाने दिलेल्या वास्तव्याच्या ठिकाणी आणल्यानंतर तेथून जवळ असणाऱ्या प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांना कळविण्याच्या सुचना संबंधितांना द्याव्यात.

3) वैद्यकीय अधिकाऱ्यांनी सर्व प्रवाशांची वैद्यकीय तपासणी करुन आवश्यकतेनुसार औषधोपचार करावेत.गरोदर माता/बालके यांची विशेष काळजी घ्यावी.

4) वैद्यकीय अधिकाऱ्यांनी सर्व प्रवाशांना कोविड-19 आजार व या आजाराच्या प्रतिबंधासाठी वैयक्तिक आणि सार्वजनिक स्तरावर घ्यावयाची काळजी याबाबत सविस्तर आरोग्य शिक्षण द्यावे.

5) प्रवाशांमध्ये ताप (100 F च्या पुढे),खोकला-धाप लागणे अशी लक्षण असणारे प्रवाशी असल्यास पुढील तपासणीसाठी त्यांना रुग्णवाहिकेने जिल्हा रुग्णालय येथे संदर्भीत करावे.

6) जिल्हा रुग्णालयांमध्ये संशयित कोविड-19 कक्षामध्ये या सर्वांना दाखल करावे आणि त्यांच्या घशातील स्त्रावाचा नमुना घ्यावा. चाचणी अहवाल समारात्मक आल्यास त्वरित आयसोलेशन कक्षात दाखल करावे, अहवाल नकारात्मक आल्यास महसुल विभागच्या मार्गदर्शक सुचनांनुसार पुढील कार्यवाही करावी.

7) रुग्णांची चाचणी सकारात्मक आल्यास त्यांच्या सहवासितांची संपुर्ण माहिती घ्यावी व त्यांना स्वंत्रपणे 14 दिवसांसाठी (Quarantine) मध्ये ठेवावे व लक्षणे आढळून आल्यास पुढील कार्यवाही करावी.

8) 500 पेक्षा जास्त प्रवासी एका ठिकाणी असतील तर, तेथे बहुविध आरोग्य सेवक (पुरुष) यांना 24 तास उपलब्ध ठेवण्यात यावे.

प्रवासी, स्थलांतरीत कामगार आणि बेघर याचेमुळे स्थानिक जनतेमध्ये कोविड-19 आजार पसरु नये यासाठी उपरोक्त नुसार कार्यवाही करण्यात यावी.

तरी, सदर पत्रामध्ये नमुद केलेल्या सुचना नुसार तात्काळ आवश्यकती कार्यवाही करण्यांत यावी.

DISTRICT MAGISTRATE
जिल्हा दंडाधिकारी
रायगड-अलिबाग
RAIGAD-ALIBAG

(निधी चौधरी)
**जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी**
**रायगड अलिबाग**

**प्रत माहिती व आवश्यकत्या कार्यवाहीसाठी**

1. मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई
2. मा.सचिव, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय, मुंबई
3. मा.संचालक आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय, मुंबई
4. मा.विभागीय आयुक्त, कोंकण विभाग, कोंकण भवन, नवी मुंबई